गांठीं असतां अमूप धन । स्वभावें जो अत्यंत कृपण ॥
धिग् धिग् तयाचे जीवन । आमरणशीण अनुभवी ॥ ३० ॥

त्यांतही वैर वृत्तीचा वारा । कदा काळींही नव्हे बरा ॥
तयापासाव मनासी आवरा । करील मातेरा जन्माचा ॥ ३१ ॥

परस्परवैराचा परिणाम । उत्तमाचा जन्मे अधम ॥
ऋणवैरहत्यांचा धर्म । फिटे तों जन्मपरंपरा ॥ ३२ ॥

ये अर्थींची अमृतवाणी । साईमुखोद्गत परमपावनी ॥
करितों सादर श्रोतयांलागुनी । असावें श्रवणीं सावधान ॥ ३३ ॥

तीही कथा जैसी ऐकिली । जैसी माझिया स्मरणीं राहिली ॥
तैसीच कथितों त्याच बोलीं । जे ती माउली वदलीते ॥ ३४ ॥

साईच स्वये चरित्रकार । लिहिवून घेई कथाविस्तार ॥
हेमाड केवळ निमित्त मात्र । सूत्रधार ज्याचा तो ॥ ३५ ॥

एके प्रातःकाळचे प्रहरीं । आठ वाजावयाचे अवसरीं ॥
करूनियां नित्याची न्याहरी । पडलों बाहेरा फिरावया ॥ ३६ ॥

मार्गीं जातां जातां श्रमलों । नदी किनारीं एका पातलों ॥
पाय धुतले स्नान केलें । अंतरीं धालों बहुवस ॥ ३७ ॥

नदी तरी होती केवढी । या राहत्याच्या नदी एवढी ॥
पाणी भरलें होतें दुथडी । कांठासी झाडी लव्हाळ्याची ॥ ३८ ॥

होती तेथें पायवाट । गाडीमार्गही होता स्पष्ट ॥
वृक्षही कांठीं होते घनदाट । छायाही उत्कृष्ट पडलेली ॥ ३९ ॥

वायू वाहे मंद मंद । तेणें मनाला बहु आनंद ॥
दृष्टी देखनि वृक्षवृंद । बैसलों स्वच्छंद छायेसीं ॥ ४० ॥

जातां चिलीम भरावयाला । तदर्थ छापी भिजवावयाला ॥
'डरांव डरांव' शब्द ऐकिला । ध्वनी मज वाटला बेडकाचा ॥४१॥
नवल काय पाणीच जेथें । बेडूक असणें सहज तेथें ॥
छापी भिजवून तंव मी परतें । घेतली हातें चकमक ॥ ४२ ॥
गारेवरी ठिणगी पाडून । चिलीम तयार झाली पेटून ॥
तोंच एक वाटसरू येऊन । बैसला वंदून मजपाशीं ॥ ४३ ॥
नम्रपणे मजकडून । चिलीम आपुले हातीं घेऊन ॥
'लई लांब झुकलांत' म्हणून । आदरें मज पुसून राहिला ॥४४॥
मशीद फार लांब येथून । तेथें जातां होईल ऊन ॥
हें पैलीकडे माझे सदन । चिलीम पिऊन जाऊं कीं ॥ ४५ ॥
तेथें वांईच खा कीं भाकर । स्वस्थ आराम करा विळभर ॥
मग ऊन खालीं झालियावर । खुशाल माघारा परतावें ॥ ४६ ॥
मीही येईन बरोबर । ऐसें भाषण झालियावर॥
चिलीम पेटवुनियां वाटसर । देई मज सादर ओढावया ॥ ४७ ॥
तिकडे तो बेडुक आर्त स्वरे । ओरड करूं लागे गजरें ॥
चौकशी केली त्या वाटसरें । कोण बरें हा ओरडतो ॥ ४८ ॥
तंव मी वदे नदी कांठीं । बेडूक सांपडलासे संकटीं ॥
लागले त्याचें कर्म त्या पाठीं ॥ ऐक ती गोठी तुज कथितों ॥ ४९ ॥
पूर्व जन्मीं जैसें करावें । इये जन्मीं तैसें भरावें ॥
कर्मभोगा सादर व्हावें । आतां रडावें किमर्थ ॥ ५० ॥
मग ऐसें हें परसून । चिलीम माझिया हातीं देऊन ॥
निघाला वाटसरू तेथून । म्हणे मी पाहून येतों जरा ॥ ५१ ॥
असे खरोखर तो बेडूक । अथवा कोणी प्राणी आणिक॥
मन तरी करूं निःशंक । काय त्या दुःख आहे तें ॥ ५२ ॥

ऐसी तयाची इच्छा बघुनी । म्हणालों मी जा ये पाहोनी ॥
एका मोठ्या सर्पाचे वदनीं । बेडूक पडुनी ओरडतसे ॥ ५३ ॥
दोघेही महा हरामखोर । दोघांचींही कृत्यें अघोर ॥
पूर्व जन्मींचीं पापें भयंकर । पावलें देहांतर भोगावया ॥ ५४ ॥
असतां चालले ऐसे विचार । गेला वाटसरू त्या जाग्यावर ॥
आला पाहूनि प्रत्यक्ष प्रकार । म्हणे तो साचार वृत्तांत ॥ ५५ ॥
सर्पही तो जैसा काळ । ऐसा मोठा जबडा विशाळ ॥
बेडूकही मोठा विक्राळ । परी तो फराळ सर्पाचा ॥ ५६ ॥
घडी अर्ध घडीचा सोबती । पडली सर्पामुखीं आहुती ॥
काय विचित्र कर्मगती । क्षणांत निश्चिती होईल त्या ॥ ५७ ॥
तंव मी म्हणालों तयातें । तो काय करितो निश्चितीतें ॥
त्याचा मी बाप आहे ना येथें । मग मी कशा तें पाहिजे ॥ ५८ ॥
सोडूनियां अपुलें स्थान । बैसलों जो येथें येऊन ॥
तो काय बेडूक खाऊं देईन । पहा मी सोडवीन त्या कैसा ॥ ५९
आतां ही झुंज सोडविल्यावरी । आपण जाऊं आपुले घरीं ॥
जा जा एकदां चिलीम भरी । पाहूं मग काय करी सर्प ॥ ६० ॥
चिलीम तात्काळ तयार केली । वाटसरूनें स्वये चेतविली ॥
झुरका मारून मजपुढे केली । हातीं मी घेतली ओढावया ॥ ६१ ॥
मारिले म्यां झुरके दोन । वाटसरूला सवें घेऊन ॥
गेलों त्या ळव्हाळ्या मधून । पावलों तें स्थान विवक्षित ॥ ६२ ॥
पुनःश्च सर्प अवलोकून । वाटसरू तो गेला भिऊन ॥
केवढें हें धूड म्हणून । निवारी मज लागून भीतीनें ॥ ६३ ॥
म्हणे नका हो जाऊं पुढे । सर्प तो येईल अपुलेकडे ॥
पळूं म्हणतां स्थळ हें सांकडे । नका हो तिकडे जाऊं नका ॥ ६४

अवलोकितां ऐसा देखावा । वाटसरू तो भ्याला जीवा ॥
मग त्या दोघांचिया वैरभावा । संबंधें परिसावा उपदेश ॥ ६५ ॥

अरे बाबा वीरभद्राप्पा । अझून हा तुझा वैरी बसाप्पा ॥
पावला नाहीं का अनुतापा । ददुर रूपा आला तरी ॥ ६६ ॥

तूंही आलासी सर्पयोनी । तरीही हाडवैर अजुनी ॥
आतां तरी शरम धरूनी । वैर त्यजूनी स्वस्थ रहा ॥ ६७ ॥

शब्द पडतां मुखांतुनी । सर्प जो पळाला बेडूक सोडुनी ॥
सत्वर खोल पाण्यांत शिरुनी । अदृश्य तेथूनि जाहला ॥ ६८ ॥

मृत्यूचिये मुखामधला । बेडूक टणकर उडून गेला ॥
तोही झाडींत जाऊन लपला । वाटसरू झाला साश्चर्य ॥ ६९ ॥

म्हणे हें काय न कळे मजला । शब्द मुखींचा तो काय पडला ॥
बेडूक कैसा सापानें सोडिला । सापही दडला तो कैसा ॥ ७० ॥

यांतील वीरभद्राप्पा कोण । तैसाच यांतील बसाप्पा कोण ॥
वाटसरू पुसे वैराचें कारण । म्हणे मज निवेदन करा कीं ॥ ७१ ॥

बरें आधीं झाडाखालतीं । जाऊं ओढूं चिलीम मागुती ॥
म्हणालों करीन जिज्ञासापूर्ती । मग मी स्वस्थळाप्रती जाईन ॥७२॥

आलों दोघे झाडाखालीं । पडली होती दाट सांउली ॥
गार वाऱ्याची झुळुक चालली ॥ पुनश्च सळगावली चिलीम ॥७३॥

वाटसरूनें आधीं ओढिली । पश्चात माझिये करीं दिधली ॥
ती मी ओढितां ओढितां कथिली । कथा त्या वहिली वाटसरूस ॥७४॥

पहा माझिये स्थळापासून । कोंस दोन अथवा तीन ॥
इतकेंच दूर पवित्रस्थान । महिमासंपन्न होतें जुनें ॥ ७५ ॥

तेथें एकमहादेवाचें । मोडकें देऊळ कधीं काळाचें ॥
तयाचिया जीर्णोद्धाराचें । आलें सर्वांचे मनांत ॥ ७६ ॥

तदर्थ मोठी वर्गणी केली । बरीच रक्कम गोळा झाली ॥
पूजेअर्चेची व्यवस्था ठरविली । पूर्ण आंखिली रूपरेषा ॥ ७७ ॥

तेथील एक मोठा धनिक । नेमिलें त्या व्यवस्थापक ॥
पैसा केला तयाचे हस्तक । पूर्ण निर्णायक तो केला ॥ ७८ ॥

तयानें कीर्द ठेवावी पृथक । तींत अपुली वर्गणी रोख ॥
जमा करावी हें कार्यही अचुक । करावें प्रामाणिकपणानें ॥ ७९ ॥

परी तो जात्या मोठा कंजूष । खार न लागावा पदरास ॥
ऐसिया धोरणें चालवी कामास । तेणें तें तडीस जाईना ॥ ८० ॥

खर्च केली सारी रकम । अर्धेमुर्धें जाहलें काम ॥
खर्चीना हा पदरचा दाम । गांठींचा छदाम सोडीना ॥ ८१ ॥

जरी मोठा सावकार । कृपणपणाचा पूर्णावतार ॥
बोलाची नुसती पेरी साखर । कामासी आकार येईना ॥ ८२ ॥

पुढें त्याच्या जमली घरीं । मंडळी पैसा जमविणारी ॥
हणे ही तुझी सावकारी । काय तरीरे कामाची ॥ ८३ ॥

महादेवाचा जीर्णोद्धार । तूं न लाविता हातभार ॥
पडेल कैसा नकळे पार । कांहीं विचार कर याचा ॥ ८४ ॥

करूनि लोकांची मनधरणी । पुनःश्च मिळवूं आणिक वर्गणी ॥
तीही देऊं तुज पाठवूनी । आण कीं ठिकाणीं हें काम ॥ ८५ ॥

पुढें आणिक पैसा जमला । उत्तम प्रकारें हातीं आला ॥
कांहीं न त्याचा उपयोग झाला । धनिक बैसला तो स्वस्थ ॥ ८६ ॥

असो जातां कांहीं दिवस । आले देवाजीच्या मनास ॥
याच धनिकाचिया कुटुंबास । जाहला ते समयास दृष्टांत ॥ ८७ ॥

तूं तरी हो जागी उठ । बांधी जा त्या देउळा घुमट ॥
जे खर्चशील त्याची शतपट । तुज तो नीळकंठ देईल ॥ ८८ ॥

दुसरे दिवशीं तो दृष्टांत । पतीच्या कानीं घातला साद्यंत ॥
कवडी खर्चतां जया प्राणांत । तया हा अत्यंत उद्वेगक ॥ ८९ ॥

करावा अहर्निशवित्त संचय । दुजा न ज्याच्या चित्ता विषय ॥
तयास या स्वप्नाचा आशय । द्रव्याचा व्यय केवि पटे ॥ ९० ॥

त्याने सांगितलें पत्नीस । मी न मानी दृष्टांतास ॥
मुळींच नाहीं माझा विश्वास । मांडला उपहास तियेचा ॥ ९१ ॥

जैसी जयाची चित्तवृत्ती । तैसीच तया जगत्स्थिती ॥
स्वयें असलिया शठप्रकृति । इतरही देखती तैसेच ॥ ९२ ॥

जरी असतें देवाचे मनीं । माझाच पैसा घ्यावा काढुनी ॥
मी काय दूर होतों तुजपासुनी । तुझेच स्वप्नीं का गेला ॥ ९३ ॥

तुलाच कां हा दृष्टांत झाला । मलाच कां तो देवें न दिधला ॥
म्हणोनि येइना भरंवसा मजला । याचा न समजला मज भाव ॥९४॥

असावे हें खोटें स्वप्न । अथवा हा असेल ईश्वरी यत्न ॥
नवरा बायकोंत व्हावी उत्पन्न । दुही हें चिन्ह दिसतें मज ॥९५॥

जीर्णोद्धाराचिये कामीं । साह्य माझे आहे का कमी ॥
महिन्या महिन्यास होते रिकामी । थैली आम्ही भरलेली ॥ ९६ ॥

लोक आणिती रक्कम सारी । दिसतें खरें हें बाह्यात्कारीं ॥
जमाखर्चाची पद्धती व्यापारी । नुकसानकारी मज बहू ॥ ९७ ॥

लोकांनाही नाहीं अवगत । कळावें तें कैसें तुजप्रत ॥
तेव्हां हा जो तुझा दृष्टांत । येईना यथार्थ मानावया ॥ ९८ ॥

खरा मानितां होईल फसगत । निद्राभंगें पडती दृष्टांत ॥
ते काय कोणी मानी यथार्थ । धनिकें हा सिद्धांत ठरवीला ॥ ९९ ॥

ऐकून बाईल बैसे निवांत । पतीपुढें ती निरुत्तर होत ॥
पैसा जरी लोक जमवीत । संतोष देत क्वचितची ॥ १०० ॥

प्रमेवीण भिडेभाडें । पडतां आग्रह अथवा सांकडे ॥
जें दिधले ते देवा नावडे । गोडीचे थोडेंही बहु मोल ॥ १०१ ॥
जैसा जैसा पैसा जमत । कामही तैसे तैसें होत ॥
पैसा थकतां कामही थकत । ऐसें तें दिरंगत चाललें ॥ १०२ ॥

धनिक काढीना कृपण जैसा । अपुल्या पिशवींतील एकही पैसा
पुनःश्च जाहला दृष्टांत कैसा । कांतेस तो परिसा धनिकाच्या॥ १०३॥

नको आग्रह करूं पतीस । पैसा देण्यास देउळास ॥
भाव तुझा पुरे देवास । द्यावें तव इच्छस येईल तें ॥ १०४ ॥

पैसा एक मनोभावाचा । स्वसत्तेचा तो लाखाचा ॥
अर्पण देवास करी साचा । विचार पतीचा घेऊन ॥ १०५ ॥

करूं नको व्यर्थ शीण । मना येईल तें द्यावें आपण ॥
स्वसत्तेचें अल्प प्रमाण । असेना अर्पण करी तें ॥ १०६ ॥

येथें केवळ भाव कारण । तुझा तो आहे हें जाणून ॥
कांहीं तरी दे दे म्हणून । आग्रह जाण देव धरी ॥ १०७ ॥
तरी जे असेल अल्प वित्त । देऊनि होई तूं निश्चिंत ॥
भावावीण देणें तें अनुचित्त । देवा न यत्किंचित आवडे ॥१०८॥
विनाभाव जो देईल । त्याचें तें सर्व मातीमोल ॥
अंतीं समूळ निष्फळ होईल । अनुभव हा येईल अविलंबें ॥ १०९

असो हा दृष्टांत ऐकुनी । केला तिनें निश्चय मनीं ॥
पितृदत्त अलंकार वेंचूनि । मागणें परिपूर्ण करावें ॥ ११० ॥

मग तीनें पती लागून । केला तो निश्चय निवेदन ॥
पतीनें तें घेतलें ऐकून । अंतरीं उद्विग्न जाहला ॥ १११ ॥

लोभ तेथें कैंचा विचार । नाहीं देवधर्म आचार॥
मनीं म्हणे हा काय अविचार । भ्रांतिष्ट साचार ही झाली ॥११२॥

म्हणे हे तिचे अलंकार । करूनियां सर्वांचा आकार ॥
मोल ठरवूनि एक हजार । जमीन नांवावर चढवावी ॥ ११३ ॥

अलंकार खरीदिले आपण । पैशा ऐवजीं पत्नी लागून ॥
दिधली अपुली जमीन खाजण । होती जो गहाण कोणाची ॥११४॥

जमीनही ती होती ओसिक । पर्जन्य काळींही नापीक ॥
पत्नीस म्हणे करून टाक । अर्पण पिनाकपाणीस ॥ ११५ ॥

हजाराची ऐसी जमीन । करितां देवालागीं दान ॥
दृष्टांतानुरूप होईल प्रसन्न । होसील उत्तीर्ण ऋणांतुनी ॥ ११६ ॥

असो मानुनि पतीचें वचन । कृपणकांता तव जमीन ॥
प्रेमभावें करी अर्पण । शंकर संतोषण व्हावया ॥ ११७ ॥

वस्तुस्थिती पाहूं जातां । दोनशेंच्या कर्जाकरितां ॥
धनिकापाशीं गहाण असतां । डुबकीची सत्ता हिजवर ॥ ११८ ॥

डुबकी एक अनाथ बाई । जमीन तीच्या सत्तेची ही ॥
ती ही जमीन गहाण देई । आपत्तिपायीं द्रव्याच्या ॥ ११९ ॥

परी धनिक महालोभी । शंकराहो फसवितां न भी ॥
कांतेचें स्त्रीधन दाबी । कपट लाभीं सुख मानी ॥ १२० ॥

बहु खोटी हे विषयलालसा । करी विषयासक्ताचे नाशा ॥
गुंतूं नये या विषयपाशा । जीविताशा असेल जरी ॥ १२१ ॥

श्रवणलालसे मरे कुरंग । सुंदर मणि धारणें भुजंग ॥
तेजावलोकन गोडिये पतंग । ऐसा हा कुसंग विषयांचा ॥ १२२ ॥

विषयभोगा लागे धन । तदर्थ यत्न करितां गहन ॥
विषयतृष्णा वाढे दारुण । अशक्य निवारण तियेचें ॥ १२३ ॥

निःसंशय बुडीत जमीन । प्रत्यत्नेंही न पिके कण ॥
ती म्हणे करा कृष्णार्पण । काय तें पुण्य दानाचें ॥ १२४ ॥

जेथें न यत्किंचितही संकल्प । कृष्णार्पण ते निर्विकल्प ॥
ऐसें नव्हे ते जोडिलें पाप । अंतीं जें संतापकारक ॥ १२५ ॥

येरीकडे गरीब ब्राह्मण । जो त्या देवाचें करी पूजन ॥
देवार्थ जमीन होतां संपादन । पावला समाधान अत्यंत ॥ १२६ ॥

असो पुढें कांहीं केलें । विपरीतचि होऊनि गेलें ॥
कृत्तिका नक्षत्र अपार वरसले । तुफान झालें भयंकर ॥ १२७ ॥

एकाएकीं वीज पडली । इमारत ती सारी खचली ॥
धुनी तेवढी सुरक्षित राहिली । दग्ध झाली अवशेष ॥ १२८ ॥

धनिकावरही पडला घाला । निजकांतेसह तोही निमाला ॥
डुबकीही पावली पंचत्वाला । शेवट हा झाला तिघांचा ॥ १२९ ॥

पुढें हा धनीक मथुरा नगरीं । एका गरीब ब्राह्मणा उदरीं ॥
तयाची ती भावीक अंतुरी । पुजाऱ्या घरीं जन्मली ॥ १३० ॥

नांव तीचें ठेविलें गौरी । डुबकीचीही आणीक परी ॥
शंकराचिया गुरवाचे उदरीं । तिये नारीचा नर झाला ॥ १३१ ॥

तया नराचें बारसें केलें । चनबसाप्पा नाम ठेविलें ॥
ऐसें तिघांचें स्थित्यंतर घडलें । फलोन्मुख झालें तत्कर्म ॥ १३२ ॥

धनिक पावतां पुनर्जन्म । वीरभद्र ठेविलें नाम ॥
हेंच कीं प्रारब्ध कर्माचें वर्म । भोगेंच उपरम तयासी ॥ १३३ ॥

शंकराचा जो पुजारी । तयाची मज आवड भारी ॥
नित्य येऊनि आम्हां घरीं । चिलीम मजबरोबरी पीतसे ॥ १३४ ॥

मग आम्ही आनंद निर्भर। गोष्टी कराव्या रात्रभर ॥
गौरी वाढली झाली उपवर। तीसही बरोबर आणीतसे ॥ १३५ ॥

तीही माझी भक्ती करी। एके दिवसीं पुसे पुजारी ॥
धुंडूनि पाहिलीं स्थळें सारी। कुठेंही पोरीचें जमेना ॥ १३६ ॥

बाबा ठिकाण पाहतां थकलों। प्रयत्न हरले टेकीस आलों ॥
किमर्थ वाहसी चिंता मी वदलों। वर मार्ग चालों लागला ॥१३७॥

मुलगी तुझी भाग्यशाली। होईल मोठी पैसेवाली ॥
तिलाच शोधीत आपले पाउलीं। वर तिचा चालीस लागला॥१३८॥

अल्पावकाशें तूझिया सदना। येईल पुरवील तुझी कामना ॥
करील गौरीचिया पाणिग्रहणा। तूझिया वचना अनुसार ॥ १३९ ॥

येरीकडे वीरभद्र। गरीबीचा घर संसार ॥
आईबापांस देऊनि धीर। सोडोनि जो घर निघाला ॥ १४० ॥

तो गांवोगांवी भिक्षाटन। कधीं मोलमजूरी करून ॥
कधीं जें मिळे तेंच खाऊन। संतुष्ट राहून फिरतसे ॥ १४१ ॥

फिरतां फिरतां दैवें आला। पुजाऱ्याचिये सदना पातला ॥
अल्लामियाची अघटित लीला। आवडूं लागला सकळांस ॥ १४२ ॥

होतां होतां लोभ जडला। वाटलें गौरी द्यावी त्याला ॥
नाडी गोत्रगण योग जुळला। आनंद झाला पुजारीया ॥ १४३ ॥

सवें घेऊन वीरभद्राला। एके दिवशीं पुजारी आला ॥
दोघां पाहूनि त्या समयाला। विचार स्फुरला एकाकीं ॥ १४४ ॥

विचारा सरिसा उच्चार झाला। सांप्रत लग्नाला मुहूर्त असला ॥
तर तूं याला या गौरीला। देऊनि मोकळा हो आतां ॥ १४५ ॥

घेऊनियां कांतेचें अनुमत। वर वीरभद्र केला निश्चित ॥
पाहोनियां विवाह मुहूर्त। विवाह यथोचित लाविला ॥ १४६ ॥

पूर्ण होतां निजकार्यार्थ । कुटुंब आलें दर्शनार्थ ॥
आणिक माझिया आशीर्वादार्थ । प्रपंची कृतार्थ व्हावया ॥ १४७ ॥
दिधलें उल्हासे आशीर्वचन । मिळूं लागतां सुखाचें अन्न ॥
वीरभद्राची मुद्रा प्रसन्न । जाहली सुखसंपन्न होतांची ॥ १४८ ॥
तोही माझे भक्तीस लागला । अल्पावकाशें संसार थाटला ॥
परी भाग्याचा कोण आथिला । येथें न जो विटला पैशाविण ॥१४९॥
या पैशाचा मोठा पेंच । थोरांमोठ्यांसही त्याचा जाच ॥
वीरभद्राही समयीं टांच । द्रव्याचा असाच हा खेळ ॥ १५० ॥
बाबा ही बेडी मोठी दुर्धर । पैशावांचून होतों बेजार ॥
कांहीं तरी सांगा प्रतिकार । जेणें मज संसार झेपेल ॥ १५१ ॥
घालितों पायीं लोटांगण । आतां न बरवें प्रतारण ॥
करा माझें संकट निवारण । तुम्हीच या कारण लग्नाला ॥ १५२ ॥
मीही त्याला बहु बोधानें । प्रेमें आशिर्वचनः द्यावें ॥
अल्ला मालीक त्या हे ठावें । संकट निरसावे त्यानेंच ॥ १५३ ॥
जाणोनि वीरभद्र मनोगत । पुरावे इच्छित मनोरथ ॥
म्हणोनि मी त्याते आश्वासित । व्हावें न दुश्चित्त यत्किंचित ॥१५४॥
निकट तुझा भाग्यकाळ । करूं नको व्यर्थ तळमळ ॥
द्रव्य तुझ्या हाताचा मळ । होईल सुकाळ तयाचा ॥ १५५ ॥
द्रव्यानें मांडिली माझी हेळणा । विसंबेना कांतेचा आणा ॥
पुरे पुरे ही आतां विटंबना । नको हा मोठेपणा लग्नाचा ॥ १५६ ॥
असो पुढें झालें अभिनव । पहा गौरीच्या ग्रहाचें गौरव ॥
खाजण जमिनीस चढला भाव । कळेना माव देवाची ॥ १५७ ॥

आला एक खरेदीदार । लाख रुपये द्यावया तयार ॥
अर्धे रोख दिधले जागेवर । अर्धे हप्त्यावर ठरविले ॥ १५८ ॥

प्रति वर्षीं दोन हजार । सव्याज द्यावे झाला विचार ॥
पैका पंचवीस वर्षानंतर । भरपाई भरपूर गौरीची ॥ १५९ ॥

ठराव सर्वांसि पसंत पडला । चनबसप्पा गुरव उठिला ॥
पैका म्हणे जो शंकरा अर्पिला । गुरव पहिला मालिक त्या ॥१६०॥

तो म्हणे मज गुरवासाठीं । अर्धें व्याज वर्षाकाठीं ॥
मिळावे माझिया हिशापोटीं । त्यावीण संतुष्टी मज नाहीं ॥ १६१ ॥

वीरभद्राप्पा नेदी कांहीं । चन बसाप्पा स्वस्थ न राही ॥
जुंपली वादावादी पाही । आले ते दोघेही मजकडे ॥ १६२ ॥

शंकर तियेचा पूर्ण स्वामी । जमीन येईना ती इतराकामीं ॥
न पडावें व्यर्थ लोभसंभ्रमीं । दोघांस मग मी सांगितलें ॥ १६३ ॥

अर्पिली जी शंकराप्रती । तिचेंच मोल आहे हें निश्चिती ॥
गौरीवीण जे जे अभिलाषिती ॥ तयांच्या माती तोंडांत ॥ १६४ ॥

देवाचिया अनुज्ञेवीण । शिवेल जो या पैशाला कोण ॥
होईल देवाचे कोपास कारण । मत्ता ही संपूर्ण देवाची ॥ १६५ ॥

प्रभुत्व जीवर पुजारियाचें । गौरीचे नातें वारसपणाचें ॥
काय चाले तैं परकीयांचे । धन तें गौरीचें स्वसत्तेचें ॥ १६६ ॥

म्हणोनि मग मी त्या दोघांतें । वदलों गौराईचिया सत्तें ॥
वर्ततां घेऊनि तिच्या अनुमतातें । कृतार्थतेतें पावाल ॥ १६७ ॥

वर्तल्या तिचिया इच्छेबाहेर । देव नाहीं राजी होणार ॥
वीरभद्राप्पास नाहीं अधिकार । स्वतंत्र व्यवहार करावया ॥१६८॥

ऐसा जरी मी माझा विचार । केला परिस्फुट तेथें साचार ॥
तरी वीरभद्र रागावला मजवर । शिव्यांचा गजर वरसला ॥ १६९ ॥

तो म्हणे बाबा तुमचिया मनीं । माझिया पत्नीची मालकी स्थापुनी॥
सर्व रकमेचा टेंकर देऊनि । निजहित साधुनी बैसावें ॥ १७० ॥

परिसोनि हे तयाचे शब्द । झालों मी जागचे जागीं स्तब्ध ॥
अल्लामियाची करणी अगाध । उगाच कां खेद करावा ॥ १७१ ॥

वीरभद्राप्पा मज हें बोलला । घरीं कांतेवरी अति तणाणला ॥
ती तव दुपारीं दर्शनाला । येऊनि विनवाला लागली ॥ १७२ ॥

बाबा कोणाचिया बोलावर । लक्ष देऊनि अवकृपा मजवर ॥
न करावी मी पसरिते पदर । लोभ मज कन्येवर असावा ॥ १७३ ॥

ऐसे तिचे शब्द परिसोन । म्यां तीस दिधले पूर्ण आश्वासन ॥
सात समुद्र न्यहाल करीन । तुज त्वां खिन्न नसावें ॥ १७४ ॥

तेच रात्रीं असतां निद्रिस्त । गौरी बाईस झाला दृष्टांत ॥
शंकरानें येऊनि स्वप्नांत । कथिलें ती मात परिसावी ॥ १७५ ॥

पैसा हा सर्व तुझा पाहीं । देऊं नको कोणास कांहीं ॥
व्यवस्था तुज वदतों तीही । सदा राहील ऐसे करी ॥ १७६ ॥

देवळप्रीत्यर्थ जो जो पैसा । चनबसाप्पा सांगेल तैसा ॥
लावावा मज त्याचा भरंवसा । निर्बंध हा ऐसा राखावा ॥ १७७ ॥

इतर कार्या पैसा लावितां । व्हावी न पैशाची अव्यवस्था ॥
म्हणून मशीदींतील बाबांस न पुसतां कांहींही व्यवस्था न करावी॥१७८

गौराबाईनें तो मजला । दृष्टांत साद्यंत कथन केला ॥
मीही सल्ला यथोचित दिधला । मानावयाला दृष्टांत ॥ १७९ ॥

मुद्दल तुझें तूंच घेई । चन बसाप्पास व्याजाची निमाई ॥
ऐसें नित्य करीत जाई । संबंध नाहीं वीरभद्रा ॥ १८० ॥
ऐसें आम्ही असतां बोलत । दोघेही ते आले भांडत ॥
परस्परानीं व्हावें शांत । उपाय मी अत्यंत वेचले ॥ १८१ ॥
शंकराचा तो दृष्टांत । झाला जो होता गोराईमत ॥
दोघांसही कथिला साद्यंत । परिसोनि उन्मत्त वीरभद्र ॥ १८२ ॥
वीरभद्रें शिव्यांची लाखोली । प्रतिपक्षावर यथेच्छ वाहिली ॥
अद्वातद्वा भाषणे केलीं । वृत्ति गांगरली दुजियाची ॥ १८३ ॥
तयास झाला उन्मत्त वात । शिव्याशापांची बडबड करीत ॥
सांपडशील तेथें घात । करीन मी म्हणत मुखानें ॥ १८४ ॥
चन बसाप्पास अनुलक्षून । वीरभद्राप्पा उन्मत्त होऊन ॥
म्हणे मी तुझे तुकडे करीन । खाईन गिळीन सगळेच ॥ १८५ ॥
चन बसाप्पा भीतित्रस्त । पाय माझे घट्ट धरित ॥
म्हणे करा मज संकटमुक्त । अभय मग देत मी त्याला ॥ १८६ ॥
तंव मी दीन चनबसाप्पाते । धीर देऊनि वदलों तेथें ॥
वीरभद्राचिया हस्तें । मरूं मी तूं त देई ना ॥ १८७ ॥
असो पुढें होऊनि वात । वीरभद्राचा जाहला अंत ॥
तो मग जन्मला सर्पयोनींत । ऐसे त्या देहांतर जाहलें ॥ १८८ ॥
चन बसाप्पास पडली दहशत । तींतचि झाला त्याचा अंत ॥
जन्म पावे दर्दुर योनींत । ऐसें हें चरित तयाचें ॥ १८९ ॥
पूर्व जन्मींच्या वैरासाठीं । जन्म आला साचा पोटीं ॥
लागला बसाप्पा दर्दुरा पाठीं । धरी त्या शेवटीं वीरभद्र ॥ १९० ॥
दर्दुर रूपें बसाप्पा दीन । भद्राप्पा सर्पामुखीं पडून ॥
परिसून तयाचें करुणा वचन । हेलावलें कीं मन माझें ॥ १९१ ॥

पूर्वी दत्तवचन स्मरून। सर्पाचिया तोंडामधून ॥
चन बसाप्पा मुक्त करून। पाळिलें वचन मी अपुलें ॥ १९२ ॥

अल्ला निज भक्तां लागून। संकट समयीं ये धाऊन ॥
त्यानेंच येथें मज पाठवून। करविलें रक्षण भक्ताचें ॥ १९३ ॥

हे तो प्रत्यक्ष अनुभवा आलें। वीरभद्राप्पास हांकून लाविलें ॥
चन बसाप्पास संकटीं तारिलें। सकल हे केलें देवाचें ॥ १९४ ॥

असो आतां भर कीं चिलीमी। पिऊनि जाईन अपुले धामी ॥
तूंही जाई अपुले ग्रामीं। लक्ष मन्नामीं असूं दे ॥ १९५ ॥

ऐसें वदोनि चिलीम प्यालों। सत्संगाचें सौख्य लाधलों ॥
फिरत फिरत परत आलों। परम मी धालों निजांतरीं ॥ १९६ ॥

इतिश्री संतसज्जन प्रेरिते। भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साई समर्थसच्चरिते। श्रीसाईमुखश्रुत कथाकथनं नाम
सप्तचत्वारिंशोऽध्यायः संपूर्णः ॥
श्रीसद्गुरुसाईनाथार्पणमस्तु। शुभंभवतु ॥

## "सत्य संकल्पाचा दाता भगवान"

या वचनांत जो सत्यार्थ आहे तोच गतांकीं निर्दैशिलेल्या आमच्या कल्पांत होता असा आमचा प्रामाणिक समज आहे. सर्व बाजूनीं पूर्ण तयारी सतां, श्रीसाईलीलेवर अगदींच अनपेक्षित व अतर्किक असा एक घांव पडला त्यामुळें ती भस्मसात होते कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. तो इतिहास नोरंजक तर नाहींच पण उलट उद्वेगजनक आहे, म्हणून त्याची वाच्यता न रणे बरे. परंतु आमचा संकल्प सत्य असल्यामुळे, त्यांतूनही श्री साईलीला भावून,त्याचे दृश्य फल हा जोड अंक वाचकांच्या हातीं देण्याचें भाग्य आम्हांला धले आहे. या पुढें दर महिन्यास एक जोड अंक नियमितपणें निघेल व लूं वर्षांत पांचवे व सहावें वर्ष पूर्ण करण्यांत येईल. कालाची विसंगतता भासूं हे म्हणून अंकांवरील महिना व साल वगळून फक्त वर्षानुक्रम व अंकानुक्रम पाचा नवा उपक्रम केला आहे. पुढील अंकांत हेमाडपंताचे श्री साईसच्चरित र्ण होऊन, नंतरच्या अंकांत महाराजांचें गद्यचरित्र क्रमशः प्रसिद्ध होईल.

## रामनवमीच्या उत्सवाचा कार्यक्रम

सालाबादप्रमाणें श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणी र्थ **श्री साईबाबा** ( संस्थान शिर्डी ) यांचा श्रीरामजयंतीचा उत्सव गुरुवार . २९-३-२८ रोजीं होणार आहे. तरी समर्थांच्या भक्त मंडळींनीं व क्षेच्छुजनांनीं निजहितार्थ महाराजांच्या पवित्र दर्शनासाठीं व तीर्थप्रसादा-ठीं आपल्या मित्रमंडळीसह अवश्य येण्याचे करावें.

### कार्यक्रम.

बुधवार ता. २८-३-२८, श्रींची स्थापना, दुपारीं कीर्तन.

गुरुवार ता. २९-३-२८, अभिषेक, जन्मोत्सव, ब्राह्मणभोजन व सायंकाळीं निशाणांची मिरवणूक.

शुक्रवार ता. ३०-३-२८, मल्लांच्या कुस्त्या, कीर्तन, रात्रौ रथाची मिरवणूक व दारुकाम.

शनिवार ता. ३१-३-२८, कीर्तन, रात्रीं पालखीची मिरवणूक.

रविवार ता. १-४-२८, काला व तीर्थप्रसाद.

संस्थानतर्फे सकल संतांचा चरणरज

**दासगणू.**

## खालील पुस्तकें आमचेकडे मिळतील.

श्रीसाईनाथ सगुणोपासना किं. ८=. ह. भ. प. दासगणुकृत संतलीलामृत किं. १॥ रु. भक्तलीलामृत १॥ रु. व भक्तिसारामृत किं. ३॥ ट. ख. शिवाय.

गो. र. दाभोळकर ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे मुंबई नं २०

श्री साईनाथ भजनमाला, श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर, रंगाऱ्याची चाळ वांद्रे येथे मिळेल.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध रहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

**बाळंत काढा नं.** १ पहिल्या दहा दिवसांचा ८१४, **बाळंत काढा नं.** २ दहा दिवसानंतर ८१४; **बाळकडू**—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ८८, **कुमारी आसव** लहान मुलांकरितां ८१२.

**सतत २५ वर्षे लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १८१० } **द्राक्षासव** { अर्धा रत्तल ८१४
दीड रत्तल २८४ } { ट ख पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवे, अरिष्टे, भस्में वगैरे ५०० वर औषधे तयार आहेत. त्याचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतीमान भरून पाठविण्याकरिता "रुग्ण-पत्रिका" ही सात आण्याची तिकिटे आली असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स**

आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना ठाकुरद्वार मुंबई नं. २.



श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापून त्र्यंबक यांनी ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.


वर्ष ५ वे ] | अंक ४-५


नलिनिदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।

क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य


श्री साईलीला कचेरी ५ हर्नेस रोड [illegible], बी. बी. [illegible]

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कविता—श्री. नीळकंठराव गडी ... ... ... | ६४३-६४६ |
| भूपाळी—श्रीमती सरस्वतीबाई ... ... ... | ६४७-६४८ |
| रामनवमीचा अहवाल ( ह. भ. प. दासगणू)... ... | ६४९-६५८ |
| श्री शिर्डी संस्थानचा ५ वा शके १८४८ चा वार्षिक रिपोर्ट | ६५९-६६६ |
| साईभावदीप—श्री. नी. रा. सहस्रबुद्धे ... ... | ६६७-६७७ |
| रामनवमी( रामजन्माख्यान ) ... ... ... | ६७८-६९८ |
| " आह्वाड "( छायाचित्र ) .. ... ... | |
| गुरु-प्रसादोद्वार—श्री. रामय्या ... ... .. | २१ |
| श्रीसाई सच्चरित—श्री. हेमाडपंत.. ... ... | ८०५ |


## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिआर्डरीनें अगाऊ रु. ३।=, व्ही पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=. मागील अंकास शिल्लक असल्यास =॥-

## ॥ श्रीसाईनाथ महाराज समर्थ ॥

॥ श्लोक मंदाक्रांता ॥

साईनाथा ! परम सुखदा ज्ञानमूर्ते समर्था ।
दुःखार्तांच्या सतत सदया वारिलें त्वां अनर्था ॥ धृ०
देवा दत्ता चरणशरणा तुष्टवीले अनंता ।
पाहूं कोठें तुजविण अतां अन्य पापाद्रिहंता ॥ १ ॥
कैसें केलें सकळ भजका देवराया अनाथ ।
दावा आम्हां झडकर अतां आमुचा साईनाथ ॥
प्रेमें भक्तां सतत पुरवी वांच्छिलेले पदार्थ ।
आतां टाळी कवण अमुचे सांग देवा अनर्थ ॥ २ ॥
भावे यावें पद निकट त्या पावला शांतिदाता ।
सद्भक्तीचा अनघ जनिता भक्त कोटी विधाता ॥
शिर्डी वाटे विमल जनते द्वारका पुण्यरूप ।
साई भासे निवळ भजका कृष्णचंद्रस्वरूप ॥ ३ ॥
शिर्डी होती वरदवरदा गाणगापूर लोकां ।
गोदा ये यास्तव बहुमुखें भेटण्या साई ओका ॥
शोकाग्नीच्या कठिण उठती लाल ज्वाळा विशाळा ।
कैशा आतां सकळ विझती चावडीच्या मशाला ॥ ४ ॥
शिर्डीचा हा परम महिमा सर्व लोकांत गाजे ।
आतां कोठें बघतिल तुला येउनि भक्तराजे ॥
हाःहा ! देवा कठिण गति ह्या पुण्य शिर्डीपुरीची ।
कैसी झाली प्रभु अदयता रुष्ट मर्जी हरीची ॥ ५ ॥
कैसा झाला कटुवर तरू निंब गोड प्रभावें ।
ज्याचे पुण्यें कविवर गणूदास भाट स्वभावें ॥

साधीसुधी
पायां सदैव
आळस के
द्वारीं महान

दारिद्र्य दुः
देईल कोण
शुभ्रांबरें
होवों प्रसन्न

ग्रामांत वा
जेथें उरे न
नांदे सदैव
जेथे न वा

श्रीसाइनाथ
बुद्धी म्हणून
आर्ती करी
साष्टांग वंद

माध्यान्ह प
नैवेद्य अर्पण
ज्याच्या अ
साष्टांग वंद
दुर्दैव योगत
त्या मागसी

साठे सभाग्य म्हणुनी छडिदार केला ।
साष्टांग वंदन तुला शिरडीश्वराला ॥ ६ ॥

पुण्यप्रताप करि पावन ग्रामलेंडी ।
सीही न होईल करीं धरितांच मेढी ॥
स्वर्गीय थाट बघतो जन चावडीचा ।
विस्मीत पाहुन तऱ्हे तव म्हँजतीचा ॥ ७ ॥

दाता गुरू स्वजन सोडुन आज गेला ।
भक्ती दया व करुणा लय अस्त झाला ॥
अ[illegible]ों तव उदास वसंतमाला ।
साष्टांग वंदन तुला शिरडीश्वराला ॥ ८ ॥

नीळकंठराव गडो



शके १८४९ चे पुण्यतिथीचे वेळीं श्रीचे समाधीसमोर वाचविण्यांत आलेली

## श्रीसद्गुरु साईनाथाची भूपाळी

चालः—घनःशाम सुंदरा श्रीधरा

चला जाऊं दर्शना शिलधिला गुरुमूर्ती पाहूं ।
तदिय पदाब्जीं विनम्र होउनि भक्तिसुमन वाहूं ॥
अज्ञ तिमिरते नष्ट कराया अवतरला सांई ।
तन्नाममहिमा वर्णन करितां मुग्ध झाले साही ॥ धृ० ॥

हा जगभरिता, ज्ञानसवीता, उदयांचली येई ।
अविद्या-कमली जीव-भ्रमर हा मुक्त दशा घेई ॥
पहांट होतां कर्मरहाट तो नित्य सुरू होई ।
सांइ वचामृत सेवन करुनि निमग्न मन होई ॥
स्पर्शन व्हावें म्हणुनि तिष्ठती कालिंदी गंगा ।
गुरुचरणाचा अगाध महिमा पातक ने भंगा ॥
मंगळकारक, भवभयहारक, समय शीघ्र आला ।
कुकुट् कर्कश ध्वनी चौघडा पाही सुरु झाला ॥
प्रभात कालीं बापु जोग ते जागवी योगींद्रा ।
पंचआरती घ्यावी नाथा सोडी योगनिद्रा ॥
भक्तवच्छला प्रसन्न होई दाखवि श्रीमुद्रा ।
उल्हासित बहु मोद वाटलो शिष्य चकोर चंद्रा ॥
अहं भावना हाचि काकडा ओवाळिन तुजला ।
क्रोध घ्रताला घालुनि भाते प्रज्वलीत केला ॥
प्रेमबाष्प तें करीं घेउनि प्रक्षाळिन तुजला ।
शांतिधवल चिर घेउनि तुझिया पुशीन मुखकमला ॥

विवेकाचा मृगमद टिकला भाळी रेखियला ।
स्वानंदाची शुद्ध शर्करा घेई नैवेद्याला ॥

प्रबोधिनी तूं राजिवनयने साइनाथ आई ।
बैसुनि माझ्या हृदय-मंदिरा अचिंत्य सुख देई ॥

जीवनभूषण साईसुतेचें सांई तूं अससि ।
बुद्धिदर्पणीं अखंड माझ्या निर्मल तूं दिससि ॥

मृत्युंजय तो सद्गुरु राणा विजया दशमीला ।
कराल अंतक अश्वावरती त्वरित आरुढ झाला ॥

स्मरण तयाचें, पुण्यतिथीचें, अखिलचि जगताला ।
चिरायू-झाले यदर्थ करिती तदिय उत्सवाला ॥

श्रीमती सरस्वतीबाई.

# श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणी कृपानिधि साई-महाराज संस्थान मौजे शिर्डी, तालुके कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांच्या श्री रामनवमीच्या वार्षिक उत्सवाचा अहवाल व जमाखर्चाचा तपशील.

जमा रु.

१३७ गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांचे मार्फत भक्तांकडून आले ते

१०० डॉक्टर के. के. धैर्यवान, मुंबई एल्. एम्. एस्.

७५ राजेश्वरराव माझोडकर देशमुख

७५ पापालाल उमरिकर

५५ सरदार मार्तंडराव भागवत. इंदूर

५१ रघुनाथ नरहर बच्युवार, पुणें

५४ नागोबा वजारी उमरी यांनीं तुपाचे दोन डबे दिले.

२७ चनैय्या तांबोळी, मल्लापा, रामचंद्र मुखेडकर यांनीं १ डबा तूप दिलें.

३० एका क्ष भक्ताकडून आले. हस्तें काकासाहेब महाजनी.

२७ बाबा, व्यंकोबा रंगारी यांनीं १ डबा तूप दिलें.

२५ श्रीमंत भवानराव बन्सुडे इंदूर

२५ नारायण जनार्दन तेंडूलकर मुंबई.

२५ रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खड.

२५ मुकुंद नरहर देशपांडे एलिचपूरकर.

२५ गोविंद व्यंकटी महाजन, मुखेड

२१ दत्तात्रय कृष्ण गाडगीळ मुंबई.

२१ जनाबाई कोठारे, मुंबई.

२१ बाबा रामचंद्र पसेवार, गंगानगर

खर्च रु.

२९८ रामचंद्र आनंदराम मारवाडी यांस रामनवमीच्या सामानाबद्दल पावत्याप्रमाणें

१२१ शेख महमद अबदुल मिय्या आकोळकर यांस.

- १०० शोभेच्या दारूबद्दल
- १३ गाडीभाडें
- ८ इनाम दिले

१२१

१६२ तूप डबे ६ मुखेड व उमरीकडील लोकांनी आणिले

- २ डबे नागोबा वंजारी उमरी
- २ चनैय्या तांबोळी मुखेड
- १ बाबा, व्यंकोबा रंगारी उमरी
- १ सखाराम रुईकर

६

५७। दगडूराम बनसीलाल मारवाडी. कोपरगाव यांनेकडून माल आणला त्याचे पावतीवर हुकूम पैसे दिले.

८१।–। पुण्याहून माल आणला त्याचा तपशील

२ पोतें तांदूळ, केशर, बदाम बेदाणा, हिंग.

**जमा रु.**

२१ धर्मैय्या नारलावार उमरी

२१ रंगनाथराव ऊर्फ दादासाहेब वरुडकर फळमनुरी फराळाचें सामान आणलें.

२० प्रभु गदेवार कोलबी

१५ धोंडोपंत वकील नांदेड

७१॥≈ निनांवी रक्कम श्री. दासगणू महाराज यांचेकडे आली ती . कांही चिठ्या गहाळ झाल्या व कांहींनी नांवे देण्यास नाकारिलें. व कांही पुढें आले ते

११ घोंडिराम ताराचंद उमरी

११ नागनाथ उत्तरवार उमरी.

११ चनैय्या मुखावार मुखेड

११ गोविंद पानसोडीकर मुखेड

११ बकटलाल शेटजी उमरी

११ किरकोळ आलेले हस्तें काका सा॰. महाजनी.

११। रामचंद्र पाटलामार्फत मनिऑर्डरीनें आले त्याचा तपशील.

२ यशवंत राजाराम जुन्नर

३। माधव गंगाधर कोरान्ने बिलीमोरा.

१ सखाराम पांडुरंग किनरे पनवेल.

५ के. व्ही. टी.

११।

११ लक्ष्मीबाई जोगळेकर पुणें.

२१ वांद्रें येथील मनिऑर्डर हस्ते रामचंद्र पाटील कोते.

१० अण्णासाहेब बोराळकर देशमुख.

१० विठ्ठलराव माधवराव ऊर्फ तात्यासाहेब देशपांडे एलिचपूर.

**खर्च रु.**

२४ हुसेन सैदुभाई बाजेवाला यांस

१८ बाजाबद्दल.

४ एक दिवस जास्त ठेवून घेतले त्याबद्दल

१॥ चहा, कॉफी, फराळाबद्दल

-॥- गाडीभाडे.

२४

३६ फराळाची, सत्री, लाडू, चिवडा हस्ते रंगनाथराव ऊर्फ दादासाहेब वरुडकर वकील, कळमनुरी

७५॥ राजैय्या आचारी मथन कालेश्वर इसम दोन यांस

६३॥ रोख जाण्यायेण्याच्या भाड्यासुद्धां

१२ उपरणें पान दोन.

७५॥

६२ गोविंद काशिनाथ करबेळकर दिनकर पुणेकर आचारी यास

४५ रोख.

३ मोटारला गाडीभाडे

१० धोतर पान एक.

४ उपरणें पान १.

६२ .

२२ पत्रावळी एकदर पाच हजार.तपशील

३ हजार निजामबादेहून आणल्या

१ हजार कोपरगांवाहून आणल्या

१ हजार शिरडींत घेतल्या.

५

३० श्री साईमहाराजांस जरीचा गलेफ घातला. हस्तें श्री. भवानराव बन्सोडे इंदूर.

॥ ॐनमःशिवाय ॥



श्री सिद्धारूढ महाराज, हुबळी.

THE MERCURY PRINTING WORKS BOMBAY

**जमा रु.**

१० चंद्रभागाबाई मांझगमकर यांनी
  ५ रोख दिले
  ५ तिखट आणिलें
१० रावसाहेब रिटायर्ड एज्युकेशनल् इन्स्पेक्टर.
१० नारायण वजारी पत्रावळी व तिखट आणले.
१० मनमोहन रंगनाथ जयकर मुंबई
१० जीवनराम बाळकृष्ण बापु भय्या कोठारी इंदूर.
१० दत्तोपंत आपटे पुणे
१० रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान मुंबई
१० आनंदराव पांडुरंग ऊर्फ काका पाटील अंधेरी
९ चनप्पा तांबोळी मुखेड
७ गणेश पांडुरंग वेद्रें मास्तर
७ मारुती पत्तेकर मुखेड
६ उद्धव चन्नावार देगलूर
६। शांताराम बळवंत नाचणे
५ माधव पुंडलीकराव नांदेडकर
५ पिरूबाई रामराव कोठारे मुंबई.
५ मार्तंडराव शिंदे इंदूर असिस्टंट जनरल.
६ श्रीकृष्ण पुरुषोत्तम पाटील अंधेरी
५ सुंदरराव दीनानाथ नवलकर
५ नारायणराव गोरक्षकर
५ लक्ष्मीबाई ,,
५ सिताराम मारवाडी मुखेड
५ मल्लापा मुखेडकर
५ रामचंद्र मुखेडकर
५ विनायक यशवंतराव

**खर्च रु.**

२२ श्री रामनवमीचे दिवशी अभिषेकाची दक्षणा, बजभट पुणतांबेकर, कोलवडकर, नगर, पंढरपूर वगैरे ठिकाणचे भटजी मंडळीस दिली.
२९॥≈ एकादशीच्या फराळाचें सामान शेंगदाणे, रताळी, भगर, खजूर, टरबूजे, केळी, वगैरेबद्दल दिले ते.
३२।≈॥ साईमहाराजांचा उपचार खर्च पांच दिवसांचा. हस्तें रामचंद्र दादा पाटील कोते
२०॥ बावा धर्माधिकारी यास अध्यात्मरामायण वाचण्याबद्दल
  १० रोख
  २॥ रेलवे भाडे
  ८ धोतराचें पान.
  २०॥
१८।≈ गूळ ढेपा ४ हस्तें बाबूराव नाना वजन ११०। शेर दर २० प्रमाणें
१८।≈ गूळ ढेपा ४ श्रीसाईबाबांकरितां धर्मार्थ दिल्या म्हणून त्यांचे नांवें जमा
  १ वामन गोंदकर
  १ बाबुराव नामे
  १ गांधी
  १ बाबुराव पुणेकर
१८ किसनराव आबाजी कासार यांस
  १५ रोख
  ३ गाडी भाडें
४८-।≈ हनुमान जयंतीचे दिवशी, महार, मांग, भिल्ल, चांभार, वढारी वगैरे गरीब लोकांस गुळाच्या शिऱ्याचें

**जमा रु.**

५ दत्तूराम रुईकर
५ रघुवीर भास्कर पुरंदरे
५ रामचंद्र सिताराम अंधेरी
५ हरिश्चंद्र रामजी मिस्त्री
५ प्रल्हादराव वकील औरंगाबादकर
५ पारखे करणीकलाल, कल्याण
५ बरवे, प्रधान, वैद्य बी. एन्.
५ बापूसाहेब देशपांडे खडकी
५ काशीताई कोल्हटकर
८ पार्वतीबाई ओजरकर हस्तें देव
५ रामराव दिवाळकर कळमनुरी
५ दत्तात्रय नागनाथ शेट्टी करकेली
५ माणिक कौटिकवार
४ भागीरथीबाई
४ नारायणराव पांडे सातेगांवकर
४ व्यंकोबा कोंडाबा
४ बापुराव पुणेकर गुळाची ढेप १
४ गांधी गुळाची ढेप १
४ वामन गोंदकर गुळाची ढेप १
४ बाबुराव नाना गुळाची ढेप १
३ जगन्नाथ पुरंदरे
२ मारुती कोंडावार
२ कृष्णाबाई पांडे गोरठे
२ रंगराव पांडे
२ दत्तात्रय राजाराम पांडे
२ चुनीलाल तारमास्तर हरदा
२ नानासाहेब करमरकर
२ खंडेराव नारायण मंत्री अंधेरी
२ बळवंतराव वैद्य अंधेरी
२ ग्यानोबा उमरीकर
२ परशराम आपाजी उमरी
२ किशनराव कोठारी

**खर्च रु.**

जेवण दिले त्याचे रामचंद्र आनंदराव मारवाडी यांस सामानाबद्दल दिले ते.

२१ भाऊदेव श्री. पांचेलगांवकर महाराजांचे पुजारी यांस
१६ जरीचा रुमाल एक
५ दक्षिणा
२१

१३ कठाळ्या श्री. पांचलेगांवकर महाराजांचा शिपाई यांस
१० धोतराचे पान
३ इनाम
१३

१२ श्री पांचलेगांवकर महाराज, त्यांचे दोन टांग्याचें भाडें दिलें ते.

१२ संस्थानचा नोकर बाळा गुरव यास जरीचा रुमाल दिला.

९॥ संस्थानचा नोकर अबदुल यास शाल दिली

१२॥। जव्हार मल, मारवाडी यांजकडून मांजरपाट कापड आणलें हस्तें राघु बाळा सोनार

२५४=। उधाराबद्दल दिले हस्तें राघु बाळा सोनार

१४॥ भाजीपाला, वांगी, बटाटे, भोपळे आळू वगैरे

१४।=॥ भोजन दक्षणा पांच दिवसांची

१६ कृष्णा चलई उमरजकर पंढरपूर यांस
१० दक्षणा
६ जाण्यायेण्याचें भाडें

जमा रु.

२ देवीदास शंकर मुळावेकर
२ त्रिंबकराव वाकुटकर
२ व्यंकटेश भिवराम उमरखेडकर
२ राजेश्वरराव गांजापूरकर
२ बाबा रजपूत मुखेड
१। विश्वनाथ
१। वसंतराव
१। बाळकृष्ण शामराव
१। कुमारी ताराबाई
१। रोजाबाई बाळाराम
१। चपुबाई
१। शेट नादिरशहा
१। रामराव दिनानाथ
१। हिरुबाई
१। राधाबाई परशराम नाचणे
१ भोसले इंदूर
१ रंगूबाई रंगोरी
२ साल्ट डिपार्टमेंट जे. आर. पोस्ट भाईंदर
१ रामचंद्र महाजनी
१ अच्युत भट कळमनुरी
१ विश्वनाथ गोपाळ खामगांव
१ राजा गोविंद करकेली
१ शंकर मुगाते वणी
१ देवीदास लक्ष्मण महाजन
१ दत्तात्रय महादेव अंधेरी
१ नारायण महादेव पत्तेवार
१ वामन विनायक
१ मोरेश्वर भास्कर प्रधान
१ बळवंत अनंत
-॥- सिताबाई प्रधान
१ सौ. लक्ष्मीबाई कौहासकर

खर्च रु.

६ नारळ प्रसादाकरितां कोपरगांवाहून आणले
११।≡ तुपाच्या डब्यांचा रेल्वे खर्च
१० विठोबा भाऊ सुतार, सर्पणाबद्दल
६॥ विठोबा भाऊ सुतार, दहीदुधाबद्दल
४॥ चहाचे ४ पुडे हस्तें त्रिंबक महाराज
७ तिखट शेर आठ हस्तें चंद्रभागाबाई व नारायण उमरीकर
५ श्रीसाईमहाराजांच्या पांच दिवसांच्या नैवेद्याची दक्षणा
५ निमगांवाहून जिलबीसाठी, दहीं आणविलें त्याबद्दल
  ४ दहीं
  १ गाडी भाडें हस्तें राघु सोनार
८ संस्थानचे चोपदार दोन यांस प्रत्येकी उपरणी
  १ बाळा काशिराम शिंपी
  २ गटया
४॥ संस्थानचा नाना पुजारी यास उपरणे पान एक
४ लक्ष्मण भट उपरणें पान १
४ मार्तंड भगत उपरणें पान १
३ संस्थानचा नोकर महादु फसल्या उपरणें पान १
१० संस्थानचे पालखी उचलणारे, अहिल्या, यादव, बयाजी, रामा यांस प्रत्येकी उपरणें पान १
५ रामजन्माच्या दिवशीं गोरगरिबांस दक्षिणा वाटली

**जमा रु.**

२ बापु हळदेकर
१ सरस्वतीबाई सुगांवकर
१० शंकर सिताराम कर्णीक वकील अलिबाग
१ शकरराव आतनूरकर
२० रंगो पत्तेवार अण्णासाहेब बोराळकर, दादा वरूडकर वकील

बाबा रंगारी, व्यंकोबा रंगारी, व मुखेडकर कोमटी यानी उपरण्याची पानें आणली

८१॥।≤। कमी पडलेली रक्कम दासगणू महाराजांनी दिली.
१५१ पांच दिवसांची पेटीची जमा आली ती

१६९५८ँ।
एकूण सोळाशें पच्याण्णव रुपये सव्वा आणा फक्त.

**खर्च रु.**

५ अनाथ विद्यार्थी यांस विद्यार्जनाकरितां दिले. हस्ते दाजी वामन चिदवर.
५ तुकाराम गुरव नकले
४ नानू संगमनेरकर महाराजांचा नैवेद्य करणार यास उपरण्याबद्दल रोख दिले
४ संस्थानचा नोकर रंग्या गुरव उपरणें पान १
५ मथ्या न्हावी, अण्णाजी, कुंभार विठोबा सुतार, फकीरा कोळी प्रत्येकास उपरणें पान १
५ दिगंबर वस्मतकर संभावना
५ लिंबाजी बोराळकर बक्षिस दिले.
२ लक्ष्मण सुतार, अबदागीरवाला उपरणें पान १
४ विश्वनाथ गुरव
२ बाबू तखंड उपरणें पान एक
१० नांदेडहून तंबू आणला त्याचें येतांजातांचें भाडें
४। श्री पांचलेगांवकर महाराजांना घेण्याकरितां दोन दिवस अगोदर गाड्या पाठविल्या त्याबद्दल
२≈ श्री पांचलेगांवकर महाराज यांच्या सामानाबद्दल गाडी भाडें
२ शिंगाड्यास उपरणें पान एक
२ दादा ताशेवाला शिर्डीचा उपरणें पान १
२ अहल्या उपरणें पान एक
३ नाना पुजारी, लक्ष्मण भट, भगत यास दक्षणा
३ उदबत्ती पुडे दोन

जमा रु.

खर्च रु.

३ अच्युकाका कळमनुरीकर संभावना

२ अप्पा कस्तुरे कळमनुरी सभावना

३ स्वैपाकाकरितां कोपरगांवाहून भांडी शुक्लेश्वर सस्थानांतून आणली व पोचतीं केली त्याबद्दल गाडीभाडे

१०॥ वांद्राच्या मनिऑर्डरीपैकी तात्या पाटील यांना दिले सबब नांवें.

५ उत्सवपत्रिका छापल्या त्याचे कार्डपाकिटाचा खर्च केला त्याबद्दल

२ गाडीभाडें कोपरगांवाहून सामान आणलें

१॥ महमद सैदू ताशेवाला

१८≈ मांडव बांधण्याचे कामीं खर्च हस्तें नथूदादा जाधव

४॥ पुणतांब्याचें गाडीभाडें, आचारी धर्माधिकारी बसून गेले त्याबद्दल

१॥ विटा, पक्या घरासाठीं घेतल्या त्याबद्दल भीमाशकर कुभार यास दिले

१ बजभट पुणतांबेकर यांस हनुमान जयतीचे दिवशीं अभिषेकाबद्दल व संभावना मिळून

१। शिलाईबद्दल

१ श्रीसाईमहाराज यांचे सस्थानांतून ३ पेले गहाळ झाले म्हणून नवे घेण्याबद्दल बाळा गुरव यांस दिले

।≡ खण हस्तें केशव शिपी

| जमा रु. | खर्च रु. | |
|---|---|---|
| | -॥- | मदीर स्वच्छ करणेबद्दल मोलकरणीस दिले |
| | ३ | शकरदेव खडकेकर दक्षणा व संभावना |
| | ४ | तांदूळ आणले त्याचें रेल्वे व गाडी भाडें वगैरे |
| | ४। | चुकारी गाड्याबद्दल उमा तेली यास |
| | ५ | सिताराम मारवाडी यास हनुमानजयताचा स्वैपाक केला त्याबद्दल<br>३ रोख<br>२ कढईचें भाडें |
| | २ | श्री पांचलेगांवकर महाराजांना पहिले दिवशी आणण्याकरितां वाजत्री लावल्याबद्दल |
| | ।।।॥८॥ | किरकोळ सामान मुलतान मारवाडी |
| | १५१ | हागामा, कुस्त्या वगैरे हस्तें तात्या पाटील कोते (पेटीची जमा) |
| | १६९५॥८।-। | एकुण सोळाशें पच्चाण्णव रुपये सव्वा आणा फक्त. |

येणे प्रमाणें तपशील चरणीं सादर केला आहे. त्यांत चुकभूल असेल त्याची माफी असावी. या रामनवमीच्या उत्सवांत इकडील लोकांना साधु कसे असतात त्याची पूर्ण जाणीव व्हावी म्हणून श्रीनरसिंहबाबा महाराज पाचलेगांवकर बाल साधु यांना विनंति करून आणविले; व त्यांच्या अंगचे अलौकिक सामर्थ्यही त्यांची इच्छा नसतांही केवळ लोकांचा भ्रम नाहीसा व्हावा म्हणून चौकसबुद्धीच्या लोकांना व इतरांना प्रत्यक्ष दाखविलें. प्रश्नोत्तररूपानें वेदांत म्हणजे काय, त्याचे प्रयोगासह तत्त्व लोकांच्या नजरेस आणून दिलें.

या उत्सवास मंडळी आली तीः--भगवानराव मांजरमकर, किसनराव पाथ-रीकर, त्रिंबक महाराज, विठलराव रामदुर्गकर, बापूसाहेब डोइफोडे, दादासाहेब वरुडकर, मुकुंदराव एलीचपूरकर, गोविंद व्यंकटी महाजन, धोंडोपंत उर्फ बाबा-साहेब वकील नांदेडकर, चनैया मुका वार, नागनाथ उत्तरवार, गोविंदराव पान-शोडीकर, बाबा रामचंद्र पत्तेवार, मारुती पत्तेवार, दत्तात्रय नाथ शटी, चनैया तांबोळी, मल्लपा, रामचंद्र, धोंडीराम ताराचंद्र, नागोबा वंजारी, नारायण वंजारी, पापालाल बाबा रंगारी, ग्यानोबा, प्रल्हादराव औरंगाबादकर वकील, श्रीमंत भवानराव बनसोडे, रामराव बनसोडे, सरदार मार्तंडराव भागवत, इंदूर, बाळा-साहेब रेगे, वामनराव, माधवराव दिक्षीत, खाडवा, गोविंदराव ब्यारिष्टर, काका-साहेब महाजनी प्रो.गणपतराव नरके, पुणें, धोंडोपंत डॉक्टर, एम्.आर. जयकर, रावबहादूर मोरेश्वरराव प्रधान, नारायण जनार्दन तेंडुरकर. दत्तोपंत गाडगीळ, मुंबई, प्रधान वकील खानदेश,भाऊसाहेब पुरंदरे, धुमाळ, अकूत.वकील, कृष्णाचार्य पंढरपूरकर, तात्या साहेब, एलीचपूरकर, वसंतराव गोरक्षकर, जोतीराव तर्खेड, श्रीकृष्ण पुरुषोत्तम पाटील, मास्तर, वैंडर मीस्त्री, रावसाहेब अण्णासाहेब दाभो-ळकर वाद्रा, रघुनाथ, बचुवार, अण्णासाहेब बोऱ्हाळकर, राजेसाहेब माझोडकर. माणिक पानशोडीकर, कचोळे वकील, नाशिक, अबाजी पाटील, उमरखेड, बाबा देशमुख,कुंटूर, तारबाबू हरदास, बाबा साहेब गोरक्षकर अशी मंडळी आली होती. शिवाय श्री. सद्गुरु नरसिंह बाबा महाराज पाचलेगांवकर आपल्या मंडळीसह आले होते. श्री. देविदास लक्ष्मण महाजन यानीं श्री. स. साईमहाराजापुढें सुश्राव्य कीर्तन केले. तसेच वहिनीबाई जोगळेकर व काशीताई कोल्हटकर, पुणे यानीं आपल्या स्त्रीमंडळामार्फत चहाची व फराळाची व्यवस्था उत्तम ठेवली होती. उत्सवास पुणतांबे, संगमनेर, कोऱ्हाळे, कोपरगांव वगैरे ठिकाणची भटजी मंडळी आली होती. बेलापुराहून बापूराव पुणेंकर हे आपल्या मंडळीसह आले होते. उत्सवास शिरा, जिलबी, साखरभात, अशी पक्वान्नें केली होती. चालू सालीं एक मांडव घालावा लागला व वामन गोंदकरनी बाबाकरितां सोड-लेल्या आपल्या मालकीच्या बोळात स्वयंपाक करावा लागला, पण त्या योगानें सोय उत्तम झाली. हनुमान जयंतीस गोरगरीबांकरिता गुळाचा

शिरा केला होता. तरी श्री. स. स. सांईनाथ महाराजानीं उत्सवास आलेल्या मंडळीवर कृपा करून त्यांचे ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधून द्यावे. व तसेच मुखेडकर कोमटी मंडळीनीं कोठी संभाळून हिशोबाचे काम चोख रीतीनें बजावलें तेव्हां त्याच्यावरही महाराजांनीं पूर्ण कृपा करावी, व दर उत्सवास येणेंबद्दल त्यांना सुबुद्धि द्यावी. गजैया मंथनकालेश्वर व गोविंद पुणेकर आचारी यानीं स्वयंपाकाची उत्तम व्यवस्था ठेवली होती. ज्या ज्या मंडळींनीं या उत्सवास द्रव्यसाह्य केले त्यावरही आपली कृपा असावी, व ज्याची नावे माहीत नाहींत अशी बरीच मंडळी आली होती त्यांवरही आपली कृपा असावी. असो. आतां यांत माझ्या हातून जाणून न जाणून ज्या काहीं चुका झाल्या असतील त्याची या दासाला माफी असावी व असेच सालोसाल ह्या सकल संताचा चरणरज जो मी दासगणु त्याच्या हस्ते सेवा घेत जावी, अशी माझी नम्र विनंती आपल्या पवित्र चरणापाशीं आहे. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

सकल संताचा चरणरज

**दासगणू.**

# श्रीसद्गुरुसाईनाथ प्रसन्न.

## श्रीशिर्डी संस्थानचा ५ वा म्हणजे शके १८४८ चा वार्षिक रिपोर्ट.

१ या वर्षांत संस्थान कमिटीच्या तीन व भक्तमंडळाची एक अशा एकंदर चार सभा भरल्या त्यात जे महत्वाचे विषय निघाले त्याचा गोषवारा खालीं दिला आहे.

२ कोणते उत्सवास काय करण्याचें याची यादी सभेपुढे माडण्यांत येऊन कोजागरी, दत्तजयंती, रंगपंचमी या संबंधाने फेरफार करण्याचे ठरले.

३ सालमजकुरीं या संस्थानावर अतिमहत्तर आपत्ति म्हणजे या संस्थानास सांप्रतची सुस्थिति येण्याचें आद्य कारण जे महाशय व श्रीसाई-बाबाचे परमभक्त व परमपूज्य श्रीयुत हरि सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित याचा ता. ५ जुलई सन १९२६ सोमवार रोजीं झालेला आकस्मिक मृत्यु ही होय. यांच्या निधनाबद्दल व यांच्या शिर्डी संस्थानच्या अप्रतिम सेवेबद्दल बराचसा मजकूर श्रीसाईलीला मासिक वर्ष शके १८४८ अंक ६ ते १० यात आलाच आहे. त्यांच्या मृत्यूमुळे भक्तमंडळांतील एक उत्साही, अनुभवी, एकनिष्ठ व स्वार्थत्यागी असा एक भक्त नाहींसा झाला त्यामुळे या संस्थानाचे अपरिमित नुकसान झालें आहे. शिर्डी संस्थान मंडळ स्थापन झाल्यापासून ते त्या संस्थेचे चिटणीस होते व तें काम त्यांनीं आपले आयुष्याचे शेवटच्या क्षणापर्यंत अतिशय समाधानकारक रीतीनें केले. त्यांचें जागीं कमिटीने श्री. गोविंद काशिनाथ गाडगीळ, बी. ए., बॅरिस्टर ॲट ला, याची निवड सर्वानुमतें केली आहे.

४ एक संडास अपुरा असल्यामुळें तीन बांधावे व त्या प्रीत्यर्थ खर्चास रु. १०० मंजूर करून जरूर ती परवानगी तालुक्याचे मामलेदारापासून चिटणीसांनीं मिळवावी म्हणून ठरलें.

५ लेडीच्या जागेत लावलेल्या झाडास पाणी देण्याकरिता लोकल बोर्डाकडून त्याच्या विहिरीचें पाणी घेण्यास परवानगी मागण्याचे ठरले.

६ मशिदींत ठेवलेल्या महाराजांच्या चर्मपादुका सुरक्षित राहाण्याकरिता त्या ठेवण्यास एक लाकडी पेटी काचेच्या झाकणाची बनवून तींत त्या ठेवण्यांत याव्या.

७ रा. रा. तात्या गणपत पाटील कोते याच्या मालकीची श्री समर्थांची तसबीर रा. रा. व्ही. बी. पेंढारकर ( ललितकला नाटक कपनीचे मालक ) यांना त्यांनीं शिर्डी संस्थानासाठीं आपला एक खेळ करवून त्याचें उत्पन्न रु. १८२८॥= या संस्थानला बहाल केल्या ऐवजीं कमिटीने नजर केली त्या ऐवजीं तशीच एक दुसरी तसबीर करवून पाटील मजकूर यास देण्याचे ठरले. तसेच हरिभक्तपरायण दासगणू महाराज यांनीं पंढरपुरास घेतलेल्या घरांत उत्सवाकरितां एक श्री साईमहाराजांची तसबीर श्री संस्थानाकडून मिळावी. कारण त्यांची पंढरपूरची संस्थाही श्री साईबाबांचीच आहे अशी मागणी केल्यावरून त्यांनाही श्री शिर्डीसंस्थानतर्फे एक तसबीर देण्याचें ठरले.

८ श्रीचे भक्त कै. वा. श्री. काकासाहेब दीक्षित व कै. वा. श्री. नानासाहेब चांदोरकर, श्री. नानासाहेब निमोणकर, श्रीमंत बापूसाहेब बुटी श्री. म्हाळसापती भगत, श्री० बाळासाहेब भाटे व तात्या पाटलाच्या मातोश्री यांचें स्मारक म्हणून व पुढील पिढीस त्याची ओळख रहावी म्हणून त्या सर्व मंडळीच्या तसबिरी श्रीसमर्थ मंदिरांतील सभामंडपांत लावाव्या असें ठरले. पैशाच्या संबंधाने संस्थानची स्थिति आजमितीला असावी तशी समाधानकारक नसल्यामुळे या तसबिरीप्रीत्यर्थ होणारा खर्च संस्थानला झेंपणार नाहीं म्हणून वरील भक्तमंडळीच्या वारसांनीं तसबिरी तयार करून देण्याची मागणी संस्थानतर्फे त्यांजकडे झाली आहे व ते या मागणीचा योग्य विचार करतील अशी संस्थानास बळकट आशा आहे. यदाकदाचित् वारसापैकीं कोणी तसबीर करून देण्याचें किंवा तसबिरीचा खर्च देण्याचें

नाकारले तर त्या विवक्षित तसबिरीकरितां वर्गणी गोळा करण्यांत यावी व तसबिरी कराव्या असें ठरले.

९ वरील मागणीप्रमाणे रा. रा. तात्यापाटील यानीं आपले संग्रहीं असलेली आपले मातोश्रीची तैल रंगाची तसबीर संस्थानला अर्पण केली त्याबद्दल संस्थान कमिटी त्याची आभारी आहे.

१० गतवर्षी ठरविल्याप्रमाणे लेंडीवरील अमराईस तारेचे कापाऊंड अजून झालेले नाहीं. त्यास रकम रु. १०० खर्च करण्यास गुदस्तांच कमिटीची मंजूरी झाली आहे.

११ शके १८४८ चे बजेट सोबत परिशिष्ट ( ब ) म्हणून जोडले आहे. त्यांतील आकडयाची आढाव्यातील आंकडयांशीं तुलना करतां असें आढळून येईल कीं, शके १८४७ सालीं मुंबईखाते खर्चाची रक्कम फक्त रु. १६४॥ आहे व शके १८४८ सालाला याच खात्याला रक्कम रु. ३६८॥ आहे. पण या १८४८ चे या खात्याचे रकमेची पोटी मोरचेल व चवरी दुरुस्तीची मिळून रक्कम रु. १३७॥ व पादुकांचे पेटीची रकम रु. ८ व शिर्डीचे सामान खरेदीची व पूजा व रोषनाईचे सामान व घोडयाकरितां लगाम वगैरे करितां खर्च झालेली ६२ रु. रकम व बापाजी देशपांडयांचा पगार रु. तीस अशा रकमा सामील असल्यामुळे ही रक्कम फुगलेली दिसते. बाकीच्या खर्चाच्या रकमा बहुतेक बजेटच्या आतच आहेत.

१२ रा. रा. सुंदरराव दिनानाथ नवलकर यांनीं आपला कै. बा. भाऊ रामनाथ दीनानाथ नवलकर यांचे मनोदयानुरूप त्यांचे नांवाने एक संगमरवरी दगडाचा सुंदर कठडा श्री साईनाथांचे समाधी सभोवतो या सालचे गुरुपौर्णिमेचे वेळीं बांधवून श्री साईबाबांच्या चरणीं अर्पण केला त्यामुळें समाधीस फार शोभा आली आहे. रा. रा. सुंदररावाच्या या कायमचे पुण्यकृत्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावे तेवढें थोडेंच आहे. या कामास सुंदररावजींस अजमासें एक हजार ( १००० रु. ) खर्च आला आहे असें समजलें. सदर्हूबद्दल संस्थान त्यांचे आभारी आहे.

१३ हें संस्थानकमिटीचें पाचवे वर्ष आहे म्हणून पंच सावत्सरिक उत्पन्नाच्या आंकडयांची तुलना करणे अयोग्य होणार नाहीं. ती तुलना येणे प्रमाणें:—

| | शके १८४४ | शके १८४५ | शके १८४६ | शके १८४७ | शके १८४८ |
|---|---|---|---|---|---|
| मा. वर्गणी | १५८२–७–६ | १०९७-१५-६ | ८५०–१५–३ | ७०७–१५–३ | ४९८–१२–० |
| वार्षिक ,, | ६५६–४–० | ५५६–०–० | ८३४—०–० | ५७३–१४–० | ५५७—८–० |
| पेटीचें उ | ७३०–६–९ | ८८९–७–३ | ८०९–१०–० | ८६३—८–३ | ८८७—६–० |
| कायम फंड | ३७०९–४–९ | ३६२४–७–० | १४९७-१४-३ | ५९४०–३–२ | ४५७८–३–२ |
| कोठी | १५८–५–० | ५९–२–० | ९७–७–६ | ४८–२–० | १०३–१४–३ |
| व्याज | .. | २१०–०–० | ५६२—७–६ | ५५९–६–० | ५६४–१२–० |

वरील कोष्टकावरून असे दिसून येईल कीं अलीकडे आपले मासिक वर्गणीचें प्रमाण फारच कमी होत चाललें आहे व याचे मुख्य कारण या वर्गणीचा बरीचशी रक्कम वर्गणीदाराचे खात्यावर बाकी उतरते आहे. या गोष्टीकडे वर्गणीदाराचे लक्ष अवश्य जावयास पाहिजे. कायम फंडाची स्थितिही सालमजकुरीं समाधानकारक नाहीं शके १८४४ पासून १८४७ पर्यंत हा फंड वर्षो न वर्ष वाढतच गेलेला आहे. पण चालू सालास त्याची वाढ सुमारे साडेतेराशे रुपयांनीं कमी पडली आहे. या गोष्टीचाही भक्तमंडळींनीं विचार करावयास पाहिजे आहे. या फंडाचेही आरंभीं आकडे चांगले पडले आहेत. पण त्याप्रमाणे रकमा देण्याकडे असावे त्या मानानें पुष्कळाचें लक्ष नाहीं. याबद्दल संस्थानकमिटीस फार दिलगिरी वाटते. यबद्दल कमेटी एक ठराव लवकरच करून कायम फंडास वर्गणीचे आंकडे घालणारे सदगृहस्थांकडे पाठविण्याचा विचार ठरविणार आहे. तेव्हां इकडेही भक्तमंडळींचे लक्ष जाऊन पुढील सालचा हा अहवाल या दृष्टीने वाचकांसमोर अधिक चांगल्या रीतीनें माडतां येईल अशी उमेद आहे

१४ शके १८४८ अखेर कायम फंडाची रकम रु.२२०५०–६–० इतकी झाली. पैकी रकम रु. ९.६५६.—९—० खर्चून रकम रु.९५०० चे